जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY

Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +91 9819208279

दिनांक :– १२/०५/२०२६

महिलांकडून वेश्या व्यवसाय करवून घेणाऱ्या एक महिला दलाल आरोपीस गुन्हे शाखेकडून अटक करुन दोन पिडीत महिलांची सुटका.

———————

ठाणे शहराच्या ''हॉटेल वंश किचन, फॅमिली रेस्टॉरंट ॲन्ड बार, सन लॉजींग बोर्डींगचे खाली, एकविरा कॉम्पलेक्स, राजलक्ष्मी कंम्पाउंड, ठाणे–भिवंडी रोड, काल्हेर, भिवंडी, जि. ठाणे प.'' या ठिकाणी एक महिला दलाल काही पिडीत व असहाय्य महिलांना फुस लावून वेश्यागमनासाठी बोलवणार आहे अशी गुप्त माहिती, गुप्त माहितीदारामार्फत ठाणे गुन्हे शाखेच्या अंतर्गत असलेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वपोनिरी वैशाली गोरडे यांना मिळाली होती.

त्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर या शाखेने **दिनांक १२/०५/२०२६ रोजी ''हॉटेल वंश किचन, फॅमिली रेस्टॉरंट ॲन्ड बार, सन लॉजींग बोर्डींगचे खाली, एकविरा कॉम्पलेक्स, राजलक्ष्मी कंम्पाउंड, ठाणे–भिवंडी रोड, काल्हेर, भिवंडी, जि. ठाणे प.''** या ठिकाणी सापळा लावून एक महिला दलाल आरोपीस **१६:३५ वाजता** ताब्यात घेवून लागलीच अटक करून तीचे तावडीतून ०२ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदर महिला दलाल आरोपी विरुध्द **नारपोली पोलीस स्टेशन, ठाणे शहर** येथे दिनांक **१३/०५/२०२६** रोजी ००:०४ वा. **गुन्हा रजि.नंबर ४११/२०२६** भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम १४३ (१) १४३ (३) सह स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच ०२ पिडीत बळीत महीलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने **मा.अधिक्षक, शांतीसदन, उल्हासनगर–५, जि.ठाणे** येथे ठेवण्यात आले आहे.

सदर कारवाई ही मा.श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे तसेच मा.श्री.विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि/वैशाली गोरडे, मपोउनि/स्नेहल शिंदे, श्रेपोउपनि/एन.डी.क्षिरसागर, सपोउपनि/२२६ व्ही.आर. पाटील, पोहवा/७३९डी.पी.महाले, पोहवा/१७४५ व्ही.जी.नाईक, मपोहवा/७४२७ आर.के.भगत, मपोअंम/८१३१ पी.जी.खरात, चापोअंम/५५३९ व्ही.के.निकम यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

————००००————